राज्य मराठी विकास संस्थेला सन २०११-१२ या आर्थिक वर्षासाठी योजनांतर्गत मंजूर अनुदानाचे वितरण.

# महाराष्ट्र शासन

मराठी भाषा विभाग,
शासन निर्णय, क्रमांक - अर्थसं-१०१२/प्र.क्र.३७/२०१२/भाषा-३,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
**दिनांक : २९ मार्च, २०१२.**

पहा :- १) शासन निर्णय, क्रमांक मविसं-२०११/प्र.क्र.३/आस्था-२ (रोख शाखा), दिनांक ६ सप्टेंबर, २०११.
२)शासन निर्णय, क्रमांक मविसं-२०११/प्र.क्र.३/आस्था-२(रोख शाखा), दिनांक १६ सप्टेंबर, २०११ (शुध्दीपत्रक).
३)शासन निर्णय, क्रमांक मविसं-२०११/प्र.क्र.३/आस्था-२(रोख शाखा), दिनांक १४ ऑक्टोंबर, २०११.
४)शासन निर्णय, क्रमांक अर्थसं-१०१२/प्र.क्र.३७/२०१२/भाषा-३, दिनांक १७ मार्च, २०१२.

**शासन निर्णय :-**

राज्य मराठी विकास संस्था मुंबई, या शासन अनुदानित संस्थेचा वेतनेतर खर्च भागविण्यासाठी सन २०११-१२ या वित्तीय वर्षी मागणी क्रमांक झेडएफ-२, प्रधानशिर्ष २२०५-कला व संस्कृती (०२) योजनांतर्गत योजना (०२)(०१) राज्य मराठी विकास संस्था ३१ सहायक अनुदान (वेतनेतर) (२२०५ ३२०५) या खाली मूळ तरतूद रु.४७,००,०००/- (अक्षरी रुपये सत्तेचाळीस लक्ष फक्त) व पूरक मागणीव्दारे रु.४७,००,०००/- (अक्षरी रुपये सत्तेचाळीस लक्ष फक्त) या प्रमाणे एकूण रु.९४,००,०००/- (अक्षरी रुपये चौऱ्याण्णव लक्ष फक्त) इतकी तरतूद मंजूर करण्यात आली आहे.

२. वरील संदर्भाधीन अनुक्रमांक १, ३ व ४ येथील शासन निर्णयानुसार अनुक्रमे रु.६,००,०००/- लक्ष (अक्षरी रुपये सहा लक्ष फक्त) इतके अनुदान एप्रिल २०११ ते जून २०११ या तीनमाहि कालावधीतील वेतनेतर खर्च भागविण्यासाठी व रू.१२,००,०००/- लक्ष (अक्षरी रुपये बारा लक्ष फक्त) इतके अनुदान जुलै २०११ ते सप्टेंबर २०११ या कालावधीतील वेतनेतर खर्च भागविण्यासाठी मंजूर करण्यात आले आहे व उर्वरीत कालावधीतील वेतनेतर खर्च भागविण्यासाठी रु.४१,००,०००/- लक्ष (अक्षरी रुपये एक्केचाळीस लक्ष फक्त) इतके अनुदान संस्थेस मंजूर करण्यात आले आहे. आता उर्वरित वेतनेतर खर्च भागविण्यासाठी रु.२०,००,०००/- (अक्षरी रुपये वीस लक्ष फक्त) इतके अनुदान संस्थेस मंजूर करण्यात येत आहे.

३. हा रु.२०,००,०००/- लक्ष (अक्षरी रुपये वीस लक्ष फक्त) इतका खर्च मागणी क्रमांक झेडएफ-२, प्रधानशिर्ष २२०५-कला व संस्कृती (०२) योजनांतर्गत योजना (०२)(०१) राज्य मराठी विकास संस्था ३१ सहायक अनुदान (वेतनेतर) (२२०५ ३२०५) या खाली सन २०११-१२ या वित्तीय वर्षी मंजूर करण्यात आलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

कृ.मा.प.

४. राज्य मराठी विकास संस्थेस सन २०११-१२ या आर्थिक वर्षासाठी मंजूर केलेले अर्थसंकल्पीय अनुदान आहरित व संवितरित करण्यासाठी श्रीमती अंजली वि. अंभिरे, अवर सचिव (आस्थापना), मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२ व श्रीमती ललिता शि.देठे, उप सचिव, मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२ यांना अनुक्रमे आहरण व संवितरण अधिकारी व नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात आलेले आहे. आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी वरील रकमेचा धनादेश " राज्य मराठी विकास संस्था, मुंबई " या नावाने काढावा.

५. संस्थेस अनुदान वितरित करण्यासंदर्भात शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक मविसं-१०९३/११/प्र.क्र.१६/९४/५, दिनांक ८.०२.१९९६ अन्वये मार्गदर्शक तत्वे विहित करण्यात आली असून या शासन निर्णयातील प्रत्येक तत्वाचे संस्थेने काटेकोरपणे पालन करावे व शासनास प्रमाणपत्र सादर करावे.

६. या आदेशाव्दारे वितरित करण्यात आलेल्या रकमेतून मासिक निधी विवरणपत्रानुसार (कॅशफ्लो नुसार) खर्च करावा. तसेच केलेल्या खर्चाचा तपशिल व उपयोगिता प्रमाणपत्र (Utilization Certificate) राज्य मराठी विकास संस्थेने शासनास सादर करावे.

७. हा शासन निर्णय वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८ चा भाग-पहिला, उपविभाग एक मधील अनुक्रमांक २७, नियम क्रमांक १४९ अन्वये प्रशासनिक विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन व वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अंदाज-२०११/प्र.क्र.९३/२०११/अर्थसंकल्प-३, दिनांक ८.२.२०१२ व दिनांक ५.३.२०१२ अन्वये देण्यात आलेल्या सूचनेनुसार व अधिकाराच्या मर्यादेत निर्गमित करण्यात येत आहे.

(संगणक संकेतांक क्र. २०१२१२१०१६४४४०५४३३)

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( ललिता शि. देठे )
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
२) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई,
३) महालेखापाल (लेखा परीक्षा)-१ महाराष्ट्र, मुंबई,
४) महालेखाकार (स्थानिक निकाय लेखा परीक्षा व लेखा) महाराष्ट्र, मुंबई,
५) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
६) सहसंचालक, लेखा व कोषागारे संगणक कक्ष, ५ वा मजला, नवीन प्रशान भवन, मुंबई,
७) उप सचिव, मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई,
८) अवर सचिव, मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई,
९) अवर सचिव, वित्त विभाग (व्यय-४ / अर्थसंकल्प-१४ / विनियम) मंत्रालय, मुंबई,
१०) अवर सचिव, नियोजन विभाग (कार्यासन - १४१४, १४७१), मंत्रालय, मुंबई,
११) संचालक, राज्य मराठी विकास संस्था, मुंबई,
१२) कार्यासन अधिकारी, आस्थापना-३, मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई,
१३) कार्यासन अधिकारी, आस्थापना-२, मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई (३ प्रती)
१४) **निवडनस्ती.**